# पंचायत समिती (शिक्षण विभाग) कुर्डूवाडी ता.माढा

श्री.बंडू शिंदे,गटशिक्षणाधिकारी  ई - मेल आयडी :- brcmadha17@gmail.com

जाक्र./तापंसकु/शिक्षण/ १७ /२०२३  कुर्डूवाडी दि. १० / १ /२०२३

प्रती,
मा.शिक्षणाधिकारी ( प्राथ.)
जिल्हा परिषद सोलापूर

**विषय RTE मान्यता / नुतनीकरण दि.१.४.२०२२ ते ३१.३.२०२५चे प्रस्ताव स्वीकारणे बाबत.**
**संदर्भ - प्राथमिक शिक्षण विभाग जि.प.सोलापुर जाक्र/जिपसो/शिक्षण/खाप्राशा-२/सोलापूर दि.१९.३.२०२०**

महोदय,
उपरोक्त संदर्भिय विषयानुसार माढा विकास गटातील स्वंयअर्थ सहाय्यीत व्यवस्थापनाच्या शाळांची RTE मान्यता / नुतनीकरणातील दि. १.४.२०२२ ते ३१.३.२०२५ प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करित आहे.तरी सदरचे प्रस्ताव गोषवारासह पुढील योग्य त्या कार्यालयीन कामकाजासाठी सविनय सादर.

गोषवारा

| अ.क्र | शाळेचे नाव | शाळा प्रकार | U - Dise Code | शाळा संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | लीड स्कुल पंढरपुर बार्शी बायपास रोड कुर्डूवाडी | स्वंयअर्थ सहाय्यीत | २७३००४०५११५ | १ |

आपला विश्वासू

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती,कुर्डूवाडी
ता.माढा,जि.सोलापूर

ku
27/1/2023
तांत्रिक आवक विभाग
शिक्षण विभाग (प्राथ.) जि. प. सोलापूर

MANAGER
Lead School, Kurduwadi

PRINCIPAL
LEAD SCHOOL KURDUWADI

# शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जिल्हा परिषद सोलापूर RTE Act 2009

## मान्यता/नुतनीकरण २०१९ ते २०२२ मान्यता आदेश.

## नमुना दोन

जाक्र.जिपसो/शिक्षण/खाप्राशा.२/प्राथ./RTE/मा.नु/२२८/१९
सोलापूर. दिनांक १३/१२/२०१९

**प्रति,**

**मुख्याध्यापक ,**
**लीड स्कूल कुर्डुवाडी ता.माढा जिल्हा सोलापूर .**
**(शाळेचा युडास क्रमांक (२७३००४०५११५ )**

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत...**

शाळेच्या मुख्याध्यापकांनी गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती **कुर्डुवाडी ता.माढा** कार्यालयाकडे सन २०१९ ते २०२२ पर्यंतच्या आरटीई मान्यतेच्या/नुतनीकरणासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी करुन सदर शाळा नियमानुसार आरटीई ॲक्ट २००९ अन्वये भौतिक सुविधा पूर्ण करीत असलेने गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, **कुर्डुवाडी ता.माढा जिल्हा:सोलापूर** यांचेकडील जाक्र,पंसकु/शिक्षण/सशिअ/२१४२/२०१९ दिनांक ०९/०९/२०१९ नुसार आरटीई मान्यते बाबतच्या शिफारसीसह स्व-प्रतिज्ञापत्रास आधिन राहून

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सोलापूर **दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२२** पर्यंतच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते ८ वी स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यम** शाळेकरीता **लीड स्कूल कुर्डुवाडी ता.माढा जिल्हा सोलापूर** या शाळेस तात्पुरती RTE-२००९ अंतर्गत नुतनीकरणाने मान्यता देण्यात येत आहे.

**सदरची मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या आधीन राहून देण्यात येत आहे.**

१)मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही. आणि **इयत्ता ८ वी** नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२)बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

३)शाळा विनाअनुदानीत असल्यास नजीकच्या दुर्बल घटकांतील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल, परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तेच्या बाबतीत देखील या प्रमाणकांचे अनुपालन करण्यात येईल.

४)परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेले बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र बँक खाते देईल.

५)संस्था शाळा कोणतीही कॅपिटीशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.

६)शाळा कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी किंवा धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारणार नाही.

MANAGER
Lead School, Kurduwadi

PRINCIPAL
LEAD SCHOOL KURDUWADI

७)(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो ज्या इयत्तेत असेल त्या इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकांस शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.
(पांच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमांच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता पाच वर्षांच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि
(आठ) शिक्षकांने/शिक्षिकेने खाजगी शिकविण्याच्या कामात स्वतःला गुतंवून घेवू नये,याची सुनिश्चिती शाळा करेल.
८) शाळा समुचित प्राधिकरणांने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमांचे पालन करील.
९)शाळा अधिनियमांच्या कलम २९ मध्ये विहित केलेप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
१०)शाळा अधिनियमांच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. शाळा तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई च्या दहा निकषांची पुर्तता करीत असलेबाबत गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,कुर्डुवाडी ता.माढा जिल्हाःसोलापूर यांचेकडून स्व-प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.
११)मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
१२)शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम व क्रिडांगण हे केवळ शिक्षणांच्या व कौशल्यविकासाच्या प्रयोजानार्थ वापरण्यात येतील.
१३) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजाकि विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदया करीता किंवा नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.
१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परीक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्रांची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविण्यात यावी.
१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेताक असा आहे. हा या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.
१७) शिक्षण संचालक/शिक्षणाधिकारी हे वेळोवळी मागणी करतील, असे अहवाल व माहीती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल, अशा सुचानांचे पालन करावे.
१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही कागदपत्रे असल्यास नुतनीकरणाने सुनिश्चित करावी.

**टिपः-** शाळेतील मुख्याध्यापकांनी सन २०१९ ते २०२२ पर्यतच्या आरटीई मान्यता/नुतनीकरणासाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी/ प्रशासनाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली ओसी(दुय्यम) नस्ती/फाईल पृष्ठ क्रमांकासह आपल्याकडेच व्यवस्थित जपूण ठेवावी. भविष्यात माहिती अधिकारीतील अर्ज कायदेशीर व नियमानुसार शाळेकडे वर्ग करण्यात येईल याची नोद घ्यावी.

(संजयकुमार राठोड)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,सोलापूर

प्रतः-१) गट शिक्षणाधिकारी,पंचायतसमिती,कुर्डुवाडी ता.माढा जिल्हाःसोलापूर यांना माहितीसाठी रवाना.
आपण सदर शाळेची संचिका पृष्ठ क्रमांक १ ते ३८ आपल्याकडे जपूण ठेवावी.

MANAGER
Lead School, Kurduwadi

PRINCIPAL
LEAD SCHOOL KURDUWADI